# प्रसिद्धीसाठी निवेदन

(१९ ऑगस्ट, २०२६ )

# महात्मा गांधी मिशन व महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, पुणे आयोजित, अखिल भारतीय गांधी साहित्य संमेलन २०२६

## ८ व ९ आक्टोबर , २०२६ , एमजीएम कँपस , छत्रपती संभाजीनगर ( औरंगाबाद)

**संभाजीनगर: महात्मा गांधी यांच्या विचारांचे अधिष्ठान असणाऱ्या महात्मा गांधी मिशन व पुणे येथील महाराष्ट्र गांधी स्मारक निधी ( स्थापना १९४८) या दोन गांधीवादी संस्थांच्या संयुक्त विद्यमाने दुसरे अखिल भारतीय गांधी साहित्य संमेलन येत्या ८ व ९ आक्टेबर २०२६ एमजीएम परिसरात संपन्न होत आहे. पहिले संमेलन हे पुण्यात गतवर्षी २०२५ ला उत्तम प्रतिसादात दिवंगत डॉ. कुमार सप्तर्षी यांच्या नेतृत्वाखाली पार पडले होते. या संमेलनाचे संमेलनाध्यक्ष संपादक व विचारवंत सुरेश व्दादशीवार हे होते.**

### संभाजीनगर गांधी संमेलनाध्यक्ष

८ व ९ आक्टोबरला डॉ. कुमार सप्तर्षी नगरात पार पडणाऱ्या या संमेलनाचे अध्यक्ष म्हणून शास्त्रज्ञ ,गांधी तंत्रज्ञान तज्ज्ञ व महाराष्ट्र नॅालेज कमीशनचे संस्थापक डॅा. विवेक सावंत हे असणार असून उद्घाटक म्हणून प्रसिद्ध हिंदी लेखक , समीक्षक,विचारवंत, जेएनयूच्या भाषा विभागाचे माजी प्रमुख संत कबीर व महात्मा गांधी यांचे अभ्यासक प्रा. डॅा. पुरुषोत्तम अग्रवाल ( नवीदिल्ली) हे राहणार आहेत.

### चार भाषांतील चार परिषदा

या गांधी साहित्य संमेलनाचे आगळेवेगळे वैशिट्य हे असणार आहे की , यानिमित्ताने महात्मा गांधी यांच्या विचार व तत्वज्ञानावर समांतरपणे मराठी, हिंदी , उर्दू आणि इंग्रजी भाषेत कामकाज व शोधनिबंध सादरीकरण होणार आहे . महात्मा गांधींचा भारतीय राष्ट्रवाद, आंतरराष्ट्रीय शांतता , लोकशाही व सामाजिक न्याय , सत्य व स्वातंत्र्य, मानवतावाद , गांधींचा अहिंसावादी सत्याग्रहाच्या मौलिकता , शाश्वत विकास व गांधी विचार , पर्यावरण व गांधी तत्त्वज्ञान , निर्भयता व संघर्ष आदि पैलूंवर शोधनिबंध सादरीकरण व विचारमंथन होणार आहे .

### गांधी संमेलन स्वागताध्यक्ष अंकुशराव कदम

या गांधी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष पद महात्मा गांधी मिशनचे सचिव व एमजीएम विद्यापीठाचे कुलपती ,व वयोवृद्ध गांधीवादी कृतिवंत अंकुशराव कदम यांनी स्विकारले आहे व त्यांच्या नेतृत्वाखालील भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॅा. विलास सपकाळ व माजी कुलगुरू प्रा. डॅा. सुधीर गव्हाणे यांच्या मार्गदर्शनाने आखले गेले आहेत.

## राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अभ्यासकांचा सहभाग

या गांधी साहित्य संमेलनात भारतातील नवीदिल्ली , मुंबई, बेंगलोर ,चेन्नई, तिरुअनंतपुरम, हैदराबाद या शहरांसह तामीळनाडू , केरळ , मध्यप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा आदि राज्यातून प्रतिनिधी व गांधी अभ्यासक येत आहेतच , याचबरोबर कोरिया , जर्मनी , अमेरिका , श्रीलंका   , दक्षिण आफ्रिका, कजागिस्थान या देशातील विश्वशांती अभ्यासक येणार आहेत.

## गांधी नाव धारण करणाऱ्या विद्यापीठ कुलगुरूंची गोलमेज परिषद

अखिल भारतीय गांधी साहित्य संमेलनाचे आणखी एक वैशिष्ट्य हे आहे की , पहिल्यांदाच भारतातील महात्मा गांधी यांचे नाव धारण करणाऱ्या सहा विद्यापीठांचे कुलगुरू व माजी कुलगुरू यांची गोलमेज परिषद होंणार असून गांधी विचार व कृतींबाबत सहयोग करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

## जेन जीचा सहभाग व विविध उपक्रमांचे आयोजन

या संमेलनात विद्यार्थी व युवकांच्या सहभागावर भर देण्यात आला असून ६० % प्रतिनिधी विद्यार्थी-युवक असणार आहेत . या साहित्य संमेलनात जर्मनीच्या फोटोग्राफर अंजा बोनहॉप यांचे “ग्लोबल फुटप्रिंटस ऑफ महात्मा गांधी “ हे छायाचित्र प्रदर्शन , विद्यार्थी वर्गासाठी गांधी लघुपट व पटकथा लेखन स्पर्धा, गांधी विचार दर्शन पोस्टर स्पर्धा, गांधी विचार स्ट्रीट प्ले स्पर्धा, गांधी स्टँप प्रदर्शन, विद्यार्थी वर्गांसाठी गांधी विचार निबंध स्पर्धा, गांधी संगीत बँड फॅार पीस अँड प्युरीटी , खादी फेस्टीवल , गांधीवग्रं्थ प्रदर्शन यासारख्या उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. गांधी संमेलनास ८५० प्रतिनिधी अपेक्षित आहेत. या संमेलनाच्या यंशस्वितेसाठी  कुलसचिव डॅा. आशिष गाडेकर , अधिष्ठाता डॅा.जॅान चल्लादुराई , प्राचार्य डॅा. रेखा शेळके , गांधी भवनचे प्रा . मच्छिंद्र गोर्डे , यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे नीलेश राऊत, प्रा. डॅा. श्रीराम जाधव , डॅा. प्रेरणा दळवी , संचालक डॅा. के. पी. सिंग , , प्रा. डॅा. रमेश जारे , प्रा. शुभा महाजन , डॅा. आशा देशपांडे, प्रा. डॅा. शीव कदम , प्रा. राजेंद्र देशपांडे, संगीतकार प्रा. डॅा. संजय मोहोड , प्रा. राजू सोनवणे, डॅा. योगिता तळेकर , प्रा. डॅा. मानसी करजगावकर , आशुतोष पाटील , हेमंत बर्वे कार्यशील आहेत.